# दि शहादा पीपल्स् को-ऑप. बँक लि.शहादा

मुख्य कार्यालय, दोंडाईचा रोड, शहादा, जि.नंदुरबार ४२५ ४०९
फोन नं- ०२५६५-२२३१०९, २२३४७२

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

आपल्या बँकेच्या सर्व सन्माननीय सभासदांना कळविण्यांत येते की, बँकेची **७४** वी वार्षिक सर्व साधारण सभा **दिनांक २४ सप्टेंबर २०२३, रविवार रोजी दुपारी ठिक २.00 वाजता " हॉटेल जैन प्लाझा "** सप्तश्रृंगी माता मंदीरा समोर, दोंडाईचा रोड, शहादा,जि.नंदुरबार येथे बँकेचे विद्यमान **प्रेसिडेंट श्री. प्रकाशचंद आसकरण जैन** यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केलेली आहे. तरी सदर सभेस आपण अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

### सभेपुढील विषय :-

१) दिनांक ०४/०९/२०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसेडिंग वाचुन कायम करणे.
२) मार्च २०२३ अखेरचा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफातोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३) नफ्याची वाटणी व सभासदांना द्यावयाच्या लाभांश प्राप्तीच्या अंशास मान्यता देणे.
४) सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाच्या उत्पन्न -खर्चाचे अंदाज पत्रकाच्या कमी-अधिक झालेल्या खर्चास मान्यता देवून सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.
५) वैधानिक लेखापरिक्षकांचा तपासणी अहवाल वाचून त्यावर दिलेल्या उत्तरांची नोंद घेणे.
६) रिझर्व्ह बँकचे परिपत्रक दि.२७ एप्रिल २०२१ या नूसार रिझर्व्ह बँकेस आर्थिक वर्ष २०२३-२४ करीता वैधानिक लेखापरिक्षकाच्या नेमणूकीचा प्रस्ताव पाठविल्याची नोंद घेणे बाबत.
७) जुलै २०२३ ते जुन २०२४ या कालावधीसाठी अंतर्गत हिशोब तपासनीसांची नेमणुक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८) बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांच्याकडे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात येणे बाकी असलेल्या कर्जाची माहिती घेणे.
९) संचालक मंडळाने सुचविलेल्या पोट नियम दुरुस्तीस मंजूरी देणे.
१०) निधींची पुर्नरचना करणे बाबत.
११) माननिय अध्यक्षांचे अनुज्ञेने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**ठिकाण - शहादा**
**दिनांक - ०७/०९/२०२३**

**मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून,**
**विजयकुमार हिरालाल राखेचा**
**सरव्यवस्थापक**
**दि शहादा पीपल्स् को-ऑप.बँक लि.शहादा**

**टिप :**

१) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास सदर सभा त्याच जागेवर त्याच दिवशी दुपारी २.३० वाजता घेण्यात येईल. तेव्हा कोरमची आवश्यकता लागणार नाही व त्या सभेत वरील नोटीसी मध्ये नमुद केलेल्या विषयांचा विचार करण्यात येईल.
२) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी सभासदांना काही सूचना करावयाच्या असतील तर त्या दि. १७/०९/२०२३ पावेतो कार्यालयीन वेळेत बँकेच्या मुख्य कार्यालयात द्याव्यात. तद्नंतर आलेल्या सुचनांचा विचार केला जाणार नाही. याची सभासदांनी नोंद घ्यावी.
३) बँकेच्या वार्षिक अहवालाची प्रत तथा सभेचा अजेंडा बँकेचे मुख्य कार्यालय व शाखांच्या नोटीस बोर्डावर तसेच www.shahadapeoplesbank.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.
४) प्रत्येक सभासदाने सभेस येतांना सदर सभेची नोटीस (अजेंडा) सोबत आणावा.

Scanned with OKEN Scanner